# विष्णूनामे

सहस्र नामे श्री विष्णुची
असो नसो पाठ ती सारी
परी पुढील सोळा तरी
जपता राहे कृपा त्याची ||१||

**जनार्दन** मुखी घास घेता
**विष्णू** उदरी औषध घेता
**पद्मनाभ** मंचकी झोपता
**प्रजापती** विवाह समया ||२||

**चक्रधर** युद्ध समयी
**त्रिविक्रम** प्रवासकाळी
**श्रीधर** मिलन समयी
**नारायण** मृत्यू समयी ||३||

**गोविंद** दुःस्वप्न पाहता
**मधुसूदन** संकट येता
**नरसिंह** वनात चुकता
**जलशायी** वणवा पेटता ||४||

**वराह** जळी नगी **रघुराम**
फिरता **वामन** सदा **माधव**
उठता सकाळी तरी निदान
घेता ही नामे हरी प्रसन्न ||५||

– नारायण
०७/३१/२३